जा. क्र. ९४६/२०१८

धर्मादाय आयुक्त भवन,
३रा मजला, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई ४०० ०१८.
दूरध्वनी क्रमांक २४९३५४३४ २४९३५४९०
फॅक्स २४९७६४२०

14 FEB 2018

**परिपत्रक क्र.** 531 **दिनांक** 14-02-2018

सर्व धर्मादाय सह आयुक्त, धर्मादाय उप आयुक्त व सहायक धर्मादाय आयुक्त यांना असे निर्देशित करण्यात येते की, आपापल्या अखत्यारीत धर्मादाय रुग्णालयांना तुमच्या विभागात अथवा जिल्ह्यात असलेल्या तुरुंगातील कैद्यांची ठराविक कालावधीने शारीरिक तपासणी करण्याचे आवाहन करावे. या अधिकारीणीची मुंबईतील हॉस्पीटल असोसिएशनशी याबाबत चर्चा झालेली असून त्यांनी मुंबई भागातील तुरुंगात जाऊन कैद्यांची तपासणी करण्यास धर्मादाय रुग्णालय तयार असल्याबाबतचे सांगितले आहे. तरी आपण आपल्या विभागातील हॉस्पीटल असोसिएशनशी चर्चा करुन याबाबत निर्णय घ्यावा. धर्मादाय रुग्णालयांनी तुरुंगात जाऊन कैद्यांची तपासणी करण्यापुर्वी संबंधित तुरुंग अधिकाऱ्याची परवानगी घ्यावी व नियमाप्रमाणेच सदरील तपासणी करावी. अनेक कैदी हे आजारी असतात, परंतु त्यांना त्या आजाराची जाणीव नसते. सदरील वैद्यकीय तपासणीमुळे त्यांना त्यांच्यावर योग्य ते उपचार मिळण्यास मदत होईल. आपण आपल्या विभागात अथवा आपल्या जिल्ह्यात राबविलेल्या तपासणी शिबीराचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(शि. ग. डिगे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

१. परिपत्रक धारिणी
२. सर्व धर्मादाय सह आयुक्त
३. सर्व धर्मादाय उप आयुक्त
४. सर्व सहायक धर्मादाय आयुक्त
५. संगणक शाखा, मुख्यालय (प्रत वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी)

D:\SWATI\Circulars\Marathi Circular.docx